नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 30/01/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावर मौजा ताराबोडी येथे दिनांक 29/01/2021 चे 10.00 वा. ते 13.00 वा. फिर्यादी यांची मुलगी कु. अमिषा सुधाकर वाघडकर, वय 17 वर्ष हीने तिचे राहते घरी कोणीही हाजर नसतांना साडीने गळफास घेवून आत्महत्या केली. त्यापुर्वी तिने आरोपी नामे– अमर गदाई, वय 20 वर्ष, रा. म्हसेपठार मोहपा याच्या नावाने चिठ्ठी लिहुन ठेवली तिचे मरणास आरोपी हा कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुधाकर गणेश वाधडकर, वय 45 वर्ष, रा. ताराबोडी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी विरुध्द कलम 306 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. आकाश शाही 9881281071 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर मौजा पशुसंवर्धन कार्यालय कळमेश्वर येथे दिनांक 28/01/2021 चे 12.10 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीकृष्ण शंकर पुरी(पशुसंवर्धन पर्यवेक्षक सहायक आयुक्त पशुवर्धन कार्यालय कळमेश्वर), वय 57 वर्ष, रा. प्रादेशीक अंडी उबवनी केन्द्र सेमीनरी हिल्स नागपूर हे काम करीत असलेल्या सहायक आयुक्त पशुसवर्धन कार्यालयाच्या पाठीमागील उघडया दारातुन अज्ञात आरोपीने प्रवेश करून 1) एक विप्रो कंपनीचा संगणक जुना वापरता किं 3,500/–रू., 2) एक कॅनॉन कंपनीचा जुना वापरता लेझर प्रिंटर किं 1,500/–रू, 3) एक एचपी कंपनीचा जुना वापरता संगणक किं 2,500/– रू, 4) एक युपीएस 2 जुना वापरता पी पॉवर प्लस किं 1,000/– रू, 5) एक लेझर प्रिंटर जुना वापरता किं 2,000/– रू, 6) एक सॅमसंग कंपनीचा लेझर प्रिंटर जुना वापरता किं 3,000/–रू. चा असा एकुण 13,500/–रू चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ नारनवरे मो न 9764004385 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर